# विदर्भ प्रजासत्ताक

RNI No. - MAHMAR 2023/84526

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -१९० वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि.२३ ऑगस्ट २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## राजकीय पक्षांना बंद करण्याचा अधिकार नाही

## कारवाई करा; मुंबई हायकोर्टाचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३ मुंबई –** बदलापूर शहरातील एका शाळेत दोन लहान मुलींवर झालेल्या अत्याचार प्रकरणाच्या निषेधार्थ महाविकास आघाडीने उद्या महाराष्ट्र बंदची हाक दिली आहे. मात्र या बंदविरोधात वकील गुणरत्न सदावर्ते यांनी मुंबई हायकोर्टात धाव घेतली होती. या याचिकेवर झालेल्या सुनावणीवेळी मुंबई हायकोर्टाने सदर बंद बेकायदेशीर असल्याचं म्हटलं आहे. राजकीय पक्षांना बंद पुकारण्याचा अधिकार नसून जे लोक बंद पुकारतील त्यांच्याविरोधात कारवाई करा, असे आदेश कोर्टाकडून देण्यात आले आहेत. महाविकास



आघाडीतील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले या नेत्यांनी राज्यातील जनतेला उद्याच्या महाराष्ट्र बंदमध्ये सहभागी होण्याचं आवाहन केलं आहे. उद्धव ठाकरे यांनी आज पत्रकार परिषद घेत हा बंद विकृती विरुद्ध संस्कृती, यासाठी आहे. हा बंद राजकारणासाठी नाही, असं म्हटलं आहे. महाविकास आघाडीतील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले या नेत्यांनी राज्यातील जनतेला उद्याच्या महाराष्ट्र बंदमध्ये सहभागी होण्याचं आवाहन केलं आहे. उद्धव ठाकरे यांनी आज पत्रकार परिषद घेत हा बंद विकृती विरुद्ध संस्कृती, यासाठी आहे. हा बंद राजकारणासाठी नाही, असं म्हटलं आहे. बदलापूर प्रकरणातील आंदोलकांवरील गुन्हे मागे घेतले पाहिजेत. नाहीतर आम्हाला उद्या रस्त्यावर उतरावं लागेल. आम्ही लाडकी बहीण योजनेच्या विरोधात नाही, पण सुरक्षित बहीण महत्त्वाची आहे. आता संतापचा कडेलोट होत आहे, अशा शब्दांत उद्धव ठाकरे यांनी आपली भूमिका मांडली आहे.

### दुपारी दोनपर्यंत कडकडीत बंद पाळा

उद्धव ठाकरे यांनी आवाहन करताना म्हटलं आहे की, हा बंद महाराष्ट्राच्या जनेतसाठी आहे. हा बंद महाविकास आघाडीचा बंद नाही तर सर्व जनतेचा बंद आहे. सर्वांनी या बंदात सहभागी व्हा तसेच उद्याचा बंद कडकडीत असावा. बंद काळात ज्या अत्यावश्यक सेवा आहे त्या चालू राहतील. दुपारी २ वाजेपर्यंत हा बंद पाळावा. दुकानदारांनाही उद्या बंद पाळावा, असे आवाहन उद्धव ठाकरे यांनी केले.

## संघर्षाचे समाधान युद्धाच्या रणांगणात होत नाही : पंतप्रधान नरेंद्र मोदी

### शांततेसाठी भारत सहकार्य करणार; पीएम रेल्वेने युक्रेनमध्ये पोहोचले



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३वॉर्सा :** शांतता प्रस्थापित करण्यासाठी भारत सर्वतोपरी सहकार्य करण्यास तयार असल्याचे प्रतिपादन गुरुवारी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केले. कोणत्याही संघर्षाचे समाधान युद्धाच्या रणांगणात होत नसल्याचा दावा मोदींनी केला. पोलंडचे पंतप्रधान डोनाल्ड टस्क यांच्यासोबत व्यापक स्तरावर द्विपक्षीय चर्चा झाल्यानंतर मोदी बोलत होते.युक्रेन व पश्चिम आशियातील संघर्ष आपल्या सर्वांसाठी चिंतेचा विषय आहे. कोणत्याही संकटात निष्पाप लोकांचा मृत्यू होणे, हे संपूर्ण मानवतेसाठी मोठे आव्हान आहे. त्यामुळे शांतात प्रस्थापित करण्यासाठी मित्र राष्ट्रांना सोबत घेऊन सर्वतोपरी सहकार्य करण्यास भारत तयार असल्याचे मोदी म्हणाले. भारताचे पंतप्रधान म्हणून मोदी वॉर्सा शहरात दाखल झाले. जवळपास अर्ध्या शतकानंतर प्रथमच भारताचे पंतप्रधान पोलंड दौऱ्यावर गेले आहेत.युक्रेन व पश्चिम आशियातील संघर्ष आपल्या सर्वांसाठी चिंतेचा विषय आहे. कोणत्याही संकटात निष्पाप लोकांचा मृत्यू होणे, हे संपूर्ण मानवतेसाठी मोठे आव्हान आहे. त्यामुळे शांतात प्रस्थापित करण्यासाठी मित्र राष्ट्रांना सोबत घेऊन सर्वतोपरी सहकार्य करण्यास भारत तयार असल्याचे मोदी म्हणाले. भारताचे पंतप्रधान म्हणून मोदी वॉर्सा शहरात दाखल झाले. जवळपास अर्ध्या शतकानंतर प्रथमच भारताचे पंतप्रधान पोलंड दौऱ्यावर गेले आहेत.

### मोदींचा युक्रेन दौरा

पोलंडचा दौरा आटोपल्यानंतर गुरुवारी सायंकाळी पंतप्रधान नरेंद्र मोदी युक्रेनला रवाना झाले. रेल्वे फोर्स वन नावाच्या रेल्वेने मोदी युक्रेनकडे निघाले आहेत. दहा तासांचा रेल्वे प्रवास केल्यानंतर ते किव्हवमध्ये दाखल होणार आहेत. यानंतर जवळपास सात तास मोदी या शहरात थांबणार आहेत.


## ४० जणांना घेऊन जाणारी भारतीय प्रवासी बस नेपाळमध्ये नदीत कोसळली, १४ जणांचा मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३ तनहुन –** ४० भारतीय प्रवाशांना घेऊन जाणारी बस नदीत कसळली आहे. बचावकार्य सुरू असून यात अनेकांचा बळी गेला असल्याची शक्यता आहे. यासंदर्भात नेपाळ पोलीस अधिकाऱ्यांनी दिलेल्याम माहितीनुसार, ४० जणांना घेऊन जाणारी भारतीय प्रवासी बस तनहुन जिल्ह्यातील मार्सयांगडी नदीत कोसळली.आतापर्यंत १४ जणांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

जिल्हा पोलीस कार्यालय तनहूनचे डीएसपी दीपकुमार राया यांनी या दुर्घटनेची पुष्टी केली आहे. यूपी एफटी ७६२३ नंबर प्लेट असलेली बस नदीत कसळली असल्याचे त्यांनी म्हटले आहे. तसेच ही बस पोखरा येथून काठमांडूला जात होती, असेही त्यांनी म्हटले आहे.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहिती नुसार, मुसळधार पावसामुळे नदीला पूर आला आहे. बसमध्ये ४० लोक बसलेले होते. यांपैकी काहींचे



रेस्क्यू करण्यात आले आहे. मात्र अनेक लोक अद्यापही बेपत्ता आहेत. नेपाळ पोलिसांनी दिलेल्या माहिती नुसार, ही घटना तानाहून जिल्ह्यात घडली आहे. संबंधित बस उत्तर प्रदेशातील आहे. मात्र, बसमध्ये बसलेले लोक उत्तर प्रदेशातील कोणत्या जिल्ह्यातून नेपाळला गेले होते? यासंदर्भात अद्याप माहिती मिळालेली नाही.

नेपाळमधील माध्यमांनी दिलेल्या वृतत्तांनुसार, ही बस पृथ्वीराज मार्गावरील दमौली मुगलिंग रोड खंड मास्र्यांगदी नदीत कोसळली. प्राथमिक दृष्ट्या वळणावर बसवरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात घडल्याचे दिसत आहे. या अपघातात अनेक लोक वाहून गेल्याची शक्यता असून काहींना रेस्क्यूही करण्यात आले आहे. अद्यापही बचावकार्य सुरू आहे.

### ..म्हणून घडली घटना –

नेपाळ पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बसचा क्रमांक णझ ऋद्ध ७६२३ हा आहे. ही बस नेपाळमधील पोखरा येथून काठमांडूला जात असताना नदीत पडला. सकाळी ११.३० च्या सुमारास हा अपघात झाला. तेथून जाणाऱ्या लोकांनी बस नदीत कोसळल्याचे पाहिले आणि पोलिसांना कळवले. ही बस उत्तर प्रदेशातील गोरखपूर जिल्ह्यातील धरमशाला मार्केटमधील सौरभ केसरवानी यांच्या पत्नी शालिनी केसरवानी यांच्या नावावर नोंदणीकृत आहे.

## मुख्यमंत्री कोण असावा यात राष्ट्रवादी काँग्रेसला स्वारस्य नाही सत्ता परिवर्तन होणे महत्त्वाचे – शरद पवार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३पुणे –** निवडणुकीआधी मुख्यमंत्री कोण हे ठरवण्यात आमच्या पक्षाला स्वारस्य नाही, सत्ता परिवर्तन होणे हे मला महत्त्वाचे वाटते, असे स्पष्ट मत ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी व्यक्त केले. बदलापूरसारख्या घटना वारंवार घडत आहेत, त्यासंदर्भात असलेल्या जनभावना व्यक्त करण्यासाठी म्हणून बंद आहे, त्यात कसलेही राजकारण नाही, असे त्यांनी सांगितले.



महाविकास आघाडीतच असलेल्या उद्धव ठाकरे यांनीच मुख्यमंत्री कोण ते ठरवा, असे म्हटले आहे. याकडे लक्ष वेधल्यानंतर पवार म्हणाले, मुख्यमंत्री कोण असावा यात राष्ट्रवादी काँग्रेसला स्वारस्य नाही. आत्ता सत्ता परिवर्तन होणे महत्त्वाचे आहे, असे मला वाटते. उत्तम प्रशासन देत राज्याचा विकास करणे, यासाठी सत्ता परिवर्तन हवे. त्यामुळे पर्याय कसा देता येईल, यालाच महत्त्व द्यायला हवे.

राज्यात अनेक ठिकाणी तुमच्याकडे येण्यासाठी अनेकजण इच्छुक आहेत. तसे जाहीर केले जात आहे, तुमच्या भेटीसाठी अनेकजण येत आहेत, याबाबत विचारले असता पवार म्हणाले, मी अनेक वर्षे अनेकांबरोबर काम केले आहे. त्यामुळे भेटीगाठी होत असतात. त्यात बाकीचे काही असतेच असे नाही. ३ सप्टेंबरला मी कोल्हापूरला जात आहे. तिथे जाहीर सभा घेण्याचा माझा विचार आहे. त्यात काही गोष्टी उघड करू, असे पवार यांनी सांगितले.

## महावितरण म्हणते .. अनधिकृत वीज पुरवठा घ्याल तर गणेशोत्सव मंडळांवर होणार कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अमरावती**

फोटो– ७ सप्टेंबरपासून गणेशोत्सवाला सुरवात होणार आहे. नागपूरसह राज्यभरात अनेक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ गणेश मूर्तींची स्थापना करून विविध कार्यक्रम घेतात. त्यासाठी मंडळांना अधिकृत वीज पुरवठा घेणे बंधनकारक आहे. यंदा अनधिकृत वीज पुरवठा घेतल्यास संबंधित मंडळांवर महावितरणकडून कारवाई केली जाणार आहे.

महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या गणेशाचे लवकरच आगमण होणार आहे. हा गणेशोत्सव आनंददायी व निर्विघ्न पार पाडण्यासाठी सार्वजनिक मंडळांनी वीज सुरक्षेबाबत गांभीर्याने उपाययोजना करण्याची गरज आहे. या मंडळांना महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने वीज पुरवठ्याबाबत महत्वाचा निर्णय दिला आहे. त्यानुसार महवितरणच्या अखत्यारीतील सर्वधर्मियांच्या सार्वजनिक उत्सवांना तात्पुरत्या वीजजोडणी साठी घरगुती वीज पुरवठ्याच्या दरानेच वीजदर निश्चित केले आहे.दरम्यान मंडळांनी अनधिकृत वीज जोडणी टाळून सार्वजनिक उत्सवांकरिता अधिकृत वीजपुरवठा घ्यावा आणि सार्वजनिक सुरक्षेला महत्व द्यावे, या उत्सवांकरिताच्या मंडप, रोषणाई, देखावे, महाप्रसाद व इतर कार्यक्रमांसाठी लागणारी वीज व्यवस्था ही अधिकृत वीजकंत्राटदारांकडूनच करून घेण्यात यावी, असे आवाहन महावितरणने केले आहे. मंडळांचा वीज पुरवठा खंडित झाल्यास तातडीच्या मदतीसाठी खालील दूरध्वनी क्रमांकावर १९१२, १९१२०, १८००२१२३४३५ किंवा १८००२३३३४३५ यावर संपर्क साधण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.




## बदलापूर वर आकांत तांडव मग अमरावतीवर मविआ चे मौन का ?

### व्होटबँकेसाठी अनुनय ? शिवराय कुळकर्णी यांचा सवाल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अमरावती –** अमरावती महानगरपालिकेच्या शाळेत अल्पवयीन विद्यार्थिनीवर विनयभंग करणाऱ्या शेख रियाज या शिक्षकाला अमरावती पोलिसांनी तक्रार येताच अर्ध्या तासाच्या आत अटक करून अभिनंदनीय कार्य केले आहे. मात्र महाविकास आघाडीवाले बदलापूर प्रकरणावर अमरावतीत पत्रकार परिषदा घेत असताना अमरावतीच्या शेख रियाज प्रकरणावर का मौन बाळगत आहेत याचा खुलासा महाविकास आघाडीने केला पाहिजे असा जाब भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ते शिवराय कुळकर्णी यांनी विचारला आहे.

बदलापूर येथील संवेदनशील घटनेनंतर अमरावती पोलिसांनी विविध शाळांमध्ये जाऊन विद्यार्थिनींचे मनोबल उंचावण्यासाठी विविध प्रकारचे कार्यक्रम केले. मनपा शाळेतील एका अल्पवयीन मुलीने गेल्या आठवड्यात आपल्या सोबत घडलेल्या दुर्घटनेची माहिती आपल्या पालकांना दिली. तिच्या आईने तात्काळ फ्रेझर पुरा पोलिसांकडे तक्रार दाखल केली. तक्रार प्राप्त होताच अर्ध्या तासाच्या आत पोलिसांनी शेख रियाज ला अटक केली. शेख रियाज वर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. आज काँग्रेसच्या नेत्या ऍड. यशोमती ताई ठाकूर आणि अन्य काँग्रेस नेत्यांनी अमरावती बदलापूर प्रकरणी पत्रकार परिषद घेऊन राज्यातील महायुती सरकारवर सडकून टीका केली. मात्र, अमरावती शहरात घडलेल्या घटनेबद्दल अवाक्षरही काढले नाही. गेल्या २४ तासात अमरावतीतील घटने संदर्भात कोणीही महाविकास आघाडीच्या नेत्याचे किंवा कार्यकर्त्यांचे साधी एक्स किंवा फेसबुक पोस्ट देखील आलेली नाही. बदलापूर प्रकरणी जीवाच्या आकांताने बोलायचे आणि अमरावतीच्या घटनेबद्दल मौन बाळगायचे यामागे महाविकास आघाडीचा कोणता उद्देश आहे हे, आघाडीच्या नेत्यांनी स्पष्ट केले पाहिजे. अमरावतीच्या संवेदनशील घटनेतील आरोपी शेख रियाज आहे म्हणून या घटनेबद्दल मौन बाळगले आहे का असा प्रश्न अमरावतीच्या जनतेकडून विचारला जातो आहे.



स्वतःच्या व्होट बँकेचा विषय आला की अनुनयाची भूमिका घेण्याची काँग्रेसची जुनी सवय आहे. तीच सवय अमरावती प्रकरणी दिसलेली आहे. महाविकास आघाडीच्या या दुटप्पी भूमिकेचा भाजपा प्रवक्त्यांनी तीव्र शब्दात निषेध केला आहे.भारतीय जनता पार्टीचे प्रवक्ते शिवराय कुलकर्णी यांच्या नेतृत्वात भाजपा महिला आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्ष सौ लताताई देशमुख, पती अलकाताई सप्रे, भारतीताई गुहे, मेघाताई हिंगासपुरे यांनी आज अमरावती पोलिसांचे अभिनंदन केले.

पोलिसांच्या जनजागृती कार्यक्रमाने आणि सतर्कतेने अल्पवयीन विद्यार्थिनींशी अश्लील चाळे करणारा शेख रियाज नावाचा नराधम पोलिसांच्या अटकेत असल्याबद्दल भाजपाने अमरावती पोलिसांचे अभिनंदन केले आहे.

## संपादकीय ......

# चिंता घटत्या ठेवींची

सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या ठेवींमध्ये वाढ होण्यासाठी विशेष मोहीम राबवा, असे आवाहन केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी बँकप्रमुखांच्या बैठकीत केले आहे. गेल्या काही महिन्यांत बँकांमधील ठेवीतील वाढीपेक्षा पतपुरवठ्यातील वाढ सुमारे ३ ते ४ टक्क्यांनी अधिक राहिली असून, त्यामुळे बँकांचे मालमत्ता-दायित्व यांचे समीकरण बिघडत चालले आहे. डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखाली उदारीकरणाचे पर्व सुरू झाल्यानंतर बँकांना व्याजदराच्या निर्धारणाबाबत स्वातंत्र्य देण्यात आले. या स्वातंत्र्याचा वापर करून बँकांनी ठेवी अधिक आकर्षक केल्या पाहिजेत, अशी सूचना अर्थमंत्र्यांनी केली. बँकांचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक आता त्या दिशेने पावले टाकतील, अशी आशा आहे. राष्ट्रीयीकृत बँकांचे देशात ठिकठिकाणी शाखांचे विशाल जाळे आहे. या विशाल जाळ्याचा लाभ घेऊन नवनवीन उत्पादने आणि सेवा देऊन ठेवींमध्ये वाढ करण्याचा प्रयत्न होऊ शकतो. चालू वर्षात बँकांच्या ठेवीवाढीचा वेग १०.६ टक्के होता, तर कर्ज वितरणातील वेग आधी १३.७ टक्के होता आणि नंतर तो १६ टक्क्यांवर गेला. शेवटी बँका गोरगरिबांपासून श्रीमंतांपर्यंत सर्वांना जी कर्जे देतात, ती ठेवींच्या रकमेतूनच. या ठेवीच आटू लागल्या तर कर्ज देणार कुठून? अर्थात, बँकांच्या आर्थिक शिस्तीचा आणि व्यवस्थापनाचा हा अत्यंत महत्त्वाचा भाग असला तरी त्यात थेट अर्थमंत्र्यांना हस्तक्षेप करायची वेळ यावी, इतका हा विषय गंभीर बनला आहे.

ठेवी संकलनातील वाढीचा वेग कमी होत असल्याबद्दल अर्थमंत्र्यांप्रमाणेच रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर डॉ. शक्तिकांत दास सातत्याने चिंता व्यक्त करत असले, तरी स्टेट बँकेच्या अर्थतज्ज्ञांचे मत काहीसे वेगळे आहे. स्टेट बँकेच्या अहवालानुसार, बँकिंग व्यवस्थेतील एकूण मुदत ठेवींपैकी ४७ टक्के ठेवी ज्येष्ठ नागरिकांच्या आहेत. युवावर्ग हा जास्त रिटर्न किंवा परतावा देणार्या गुंतवणुकीच्या अन्य साधनांकडे वळत आहे. ठेवींवरील कराचा पुनर्विचार केला गेल्यास ठेवी वाढण्यास मदत होईल, या कारणाचा विचार होताना दिसत नाही. आर्थिक वर्ष २०२१-२२ पासून बँकातील ठेवींमध्ये वाढ होत असून, त्या ६१ लाख कोटी रुपयांवर पोहोचल्या आहेत. याचवेळी कर्जातील वाढ ५९ लाख कोटी रुपये आहे. या विशिष्ट काळात तरी ठेवींचे प्रमाण कमी होत असल्याचे दिसत नाही, असा या अहवालाचा निष्कर्ष आहे; पण याच अहवालात २०२२-२३ आणि २०२३-२४ मध्ये बँकांच्या ठेवींतील वाढ ही कर्जातील वाढीपेक्षा कमी असल्याची कबुली देण्यात आली आहे. २०२२-२३ मध्ये ठेवीतील वाढ १५.७ लाख कोटी रुपये, तर कर्जातील वाढ १७.८ लाख कोटी रुपये होती. त्यामुळे कर्ज-ठेव गुणोत्तर तेव्हा चक्क ११३ टक्क्यांवर जाऊन पोहोचले! २०२३-२४ मध्ये ही ठेवींतील वाढ २४.३ लाख कोटी रुपये, तर कर्जातील वाढ त्यापेक्षा जास्त, म्हणजे २७.५ लाख कोटी रुपये अशी आहे. भारतीय बँकिंग व्यवस्थेने सलग २६ व्या महिन्यात ठेवींतील वाढ कमी नोंदवली. म्हणजे गेल्या दोन वर्षांत ठेवी-कर्ज गुणोत्तराची परिस्थिती काळजी करण्यासारखीच आहे, हे स्टेट बँकेनेही मान्य केले आहे. बँकांकडे पुरेशा ठेवीच नसतील, तर सर्व ग्राहकांच्या कर्जविषयक मागण्या पूर्ण करणे बँकांना शक्य होणार नाही.

तंत्रज्ञानामुळे पतपुरवठ्यात वाढ आणि वितरणही जलद गतीने शक्य झाले असले, तरी भौतिक माध्यमांद्वारे मोठ्या प्रमाणावर ठेवी संकलनाचे काम मागे पडत असल्याचे दिसते. शिवाय अनेक बँकांनी ताळेबंद स्वच्छ असल्याचे दाखवण्यासाठी बुडीत खात्यातील कर्जे निर्लेखित केली; पण त्यामुळे बँकांचे आरोग्य सुधारले, असे बिलकुल म्हणता येणार नाही. त्यामुळे कर्जवसुली वाढवताना, जाणीवपूर्वक कर्ज बुडवणार्या धनिकांना बडगा दाखवण्याचा पर्याय उरतो. ठेवीदारांच्या पैशातून धनिक-वणिकांचे लाड पुरवणे, हे बँकांचे काम नाही. ज्या ठेवीदारांच्या आधारावर बँकांची इमारत उभी असते, तो पायाच उखडला जाणार नाही, याची दक्षता न घेतल्यास बँका संकटात सापडतील, हे विसरून चालणार नाही.

## ग्रामीण तरुणांसाठी सुवर्णसंधी..

# राज्य सरकारच्या ह्या योजनेतून कमवा महिन्याला दहा हजार वाचा सविस्तर

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक**

महाराष्ट्र राज्यात सरकारी योजनांचा प्रचार करणे आणि महाराष्ट्रातील जास्तीत जास्त नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ घेता यावा, यासाठी महाराष्ट्र राज्य सरकारने मुख्यमंत्री योजना दूत या पदासाठी ५० हजार रिक्त जागांसाठी भरती आयोजित केली असून, मुख्यमंत्री योजना दूतसाठी ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे.

भरतीसाठी कोणत्याही प्रकारची परीक्षा अथवा मुलाखत घेतली जाणार नाही आणि उमेदवारांची निवड ही थेट केली जाणार आहे. तुम्हीदेखील नोकरीच्या शोधात असल्यास तुम्हाला या राज्य सरकारच्या कार्यक्रमाचा लाभ घेऊन तुमच्या गावात किंवा तुमच्या शहरात राहूनच काम करता येणार आहे.

**महिन्याला दहा हजार मानधन**

निवड झाल्यानंतर राज्य सरकारच्या वतीने या सर्व उमेदवारांना महिन्याला दहा हजार रुपये वेतनश्रेणी दिली जाणार आहे, निवड झालेल्या उमेदवारांचा ६ महिन्यांसाठीचा करार केला जाणार आहे. या करारामध्ये कोणत्याही परिस्थितीमध्ये वाढ करण्यात येणार नाही. निवड झालेल्या उमेदवारांना सरकारी सुविधांचा लाभदेखील दिला जाणार नाही, याची सर्व अर्जदारांनी नोंद घेणे आवश्यक आहे.

**आवश्यक पात्रता काय?**



योजनेचा अर्ज करण्यासाठीचा उमेदवार १८ ते ३५ वर्षे वयोगटातील असावा,

उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असणे आवश्यक आहे.

कोणत्याही क्षेत्रातून पदवीधर शिक्षण पूर्ण झालेले असावे.

उमेदवाराकडे संगणक चालविण्याचे कौशल्य असणेदेखील आवश्यक आहे.

उमेदवाराकडे अद्ययावत असलेला मोबाइल म्हणजेच स्मार्टफोन असणे आवश्यक आहे.

उमेदवाराकडे आधार कार्ड असणे आवश्यक आहे.

उमेदवाराच्या आधारकार्डला बँक खातेदेखील लिंक असणे आवश्यक असणार आहे.

आवश्यक कागदपत्रे काय?

अर्जदाराचे आधार कार्डदेखील असणे आवश्यक आहे.

शैक्षणिक पुरावा म्हणून पदवी उत्तीर्ण असलेले प्रमाणपत्र असावे.

उमेदवाराचा रहिवासी दाखला असावा. वैयक्तिक बँक खात्याचा तपशीलदेखील असणे आवश्यक आहे.

उमेदवाराकडे पासपोर्ट साइज फोटो असावा आणि उमेदवाराचे हमीपत्र असावे.

**कोणती कामे करावी लागणार?**

निवड झालेल्या उमेदवारांना संबंधित जिल्हा माहिती अधिकारी यांच्या संपर्कात राहून जिल्ह्यातील योजनांची सर्व माहिती दिली जाणार आहे. प्रशिक्षित योजनादूतांनी त्यांना नेमून दिलेल्या ठिकाणी समक्ष जाऊन त्यांना ठरवून दिलेले काम पार पाडणे बंधनकारक असणार आहे. योजनादूतांनी राज्य शासनाच्या विविध योजनांचा प्रचार आणि प्रसिद्धी करताना ग्राम पातळीवरील यंत्रणांशी समन्वय करून शासनाच्या योजनांची घरोघरी माहिती होईल, यासाठी प्रयत्न करावे लागणार आहेत. त्यांनी दिवसभर केलेल्या कामाचा विहित नमुन्यातील अहवाल ऑनलाइन अपलोड करतील.

**येथे संपर्क साधा-** तुमच्या जिल्ह्याच्या ठिकाणी असणारे सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांचेशी संपर्क करू शकता. अधिक माहितीसाठी उमेदवारांनी कौशल्य, रोजगार उद्योजकता व नावीन्यता विभागाची अधिकृत वेबसाइट https://rojgar.mahaswayam. gov.in/ पहा.




## पावसाळ्यात शिळं खाऊ नयेच तब्येत बिघडते पण शिळी चपाती खाण्याचे मात्र होतात ५ फायदे!

**विदर्भ प्रजासत्ताक**

**आहार विशेष**-चपाती आणि भात हे रोजच्या आहारातील भाग आहेत. गव्हाची चपाती असो किंवा मल्टीग्रेट चपती. याशिवाय भारतीय थाळी अपूर्ण वाटते. बरेचजण ताजी फुगलेली चपाती खाणं पसतं करतात. पण अनेकदा चपात्या शिल्लक राहतात. शिळे अन्न म्हणून काहीजण चपात्या फेकून देतात तर काहीजण चपाती आवडीने खातात. शिळी चपाती खाल्लयाने शरीराचं नुकसान होऊ शकत असं अनेकांचे म्हणणे आहे.




एक्सपर्ट्सच्या म्हणण्यानुसार ताज्या चपातीच्या तुलनेत शिळी चपाती खाणं तब्येतीला बरेच फायदे मिळतात. शिळ्या चपाती गुड बॅक्टेरियाज असतात. ज्यामुळे गट हेल्थ चांगली राहते. शिळ्या चपात्यांमुळे बॅक्टेरियाज वाढतात आणि डायजेशन सुधारण्यास मदत होते. शिळं अन्न पचनक्रियेसाठी खराब मानलं जातं. पण शिळी चपाती डायजेस्टिव्ह सिस्टिमसाठी चांगली असते. फक्त शिळी चपाती खाताना ही गोष्ट लक्षात घ्यायला हवी की चपाती अति प्रमाणात शिळी असू नये.

तुम्ही सकाळीची चपाती रात्री किंवा रात्रीची चपाती सकाळी खा. चपाती जास्त शिळी असू नये. १ दिवस शिळी चपाती खाल्ली तर यामुळे तब्येतीला नुकसान होणार नाही. एक्सपर्ट्सच्या म्हणण्यानुसार १० ते १२ तास आधी तयार केलेली चपाती खाणं फायदेशीर ठरतं.

चपातीत रेजिस्टेंस स्टार्च वाढतात जे तब्येतीसाठी फायदेशीर ठरतात. डायबिटीसमध्ये रेजिस्टंट स्टार्च फायदेशीर ठरते. ज्यामुळे ब्लड शुगर लेव्हल स्पाईक होत नाही. शिळ्या चपातीत व्हिटामीन बी१२ चे प्रमाण जास्त असते. ज्या लोकांमध्ये व्हिटामीन बी-१२ कमी असते त्यांनी शिळ्या चपाती खायला हव्यात.एक्सपर्ट्सच्या म्हणण्यानुसार शिळी चपाती वजन कमी करण्यास मदत होते. शिळी चपाती दही किंवा तूपाबरोबर खाऊ शकता. किंवा चपातीचा कुस्करा बनवू शकता. निरोगी राहण्यासाठी संतुलित आहार घेणं गरजेचं आहे. तुम्ही शिळ्या चपातीचे सेवन सकाळच्या नाश्त्याला किंवा दुपारच्या जेवणाला करू शकता.

# विधी क्षेत्रातील दिग्गज उद्याला बुलढाण्यात!



विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२३बुलढाणा-** बुलढाणा जिल्ह्याच्या विधी क्षेत्रातील इतिहासात येत्या शनिवारी,२४ ऑगस्ट रोजी एका विक्रमाची भर पडणार आहे. या क्षेत्रातील राष्ट्रीय व राज्य स्तरावरील दिग्गज एका कार्यक्रमासाठी बुलढाण्यात येत आहे. यामध्ये मूळचे वैदर्भीयन आणि सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई, न्यायमूर्ती प्रसन्न वैराळे, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्या. देवेंद्र कुमार उपाध्याय,न्या. तथा नितीन सांबरे यांचा प्रामुख्याने समावेश आहे.याशिवाय मुंबई उच्च न्यायालयाचे आठ ते दहा न्यायाधीश, बुलढाणा जिल्ह्यातील न्यायाधीशवृंद, वकील संघाचे पदाधिकारी, वकील मंडळी यावेळी उपस्थिती राहणार आहे. या दिग्गजांची एकत्रित हजेरी बुलढाणा जिल्ह्याच्या आजवरच्या विधी इतिहासातील एक विक्रम ठरावा. यापूर्वी चौदा वर्षा पूर्वी बुलढाणा न्यायालयाच्या एका कार्यक्रमात तत्कालीन राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील येथे आल्या होत्या. त्यानंतर २४ ऑगस्टच्या कार्यक्रमानिमित्त विधी क्षेत्रातील मान्यवर येथे येत आहे.बुलढाणा जिल्ह्यात विधी क्षेत्रातील नामवंत येण्यास कारणही तसेच आहे.

ब्रिटिश कालीन आणि ११५ वर्ष जुन्या जिल्हा न्यायालयाच्या इमारतीचे आता रुपडे पालटणार आहे. त्या काळातील जिल्हा न्यायालयाच्या इमारतीचा काया पालट होणार असून त्याजागी अत्याधुनिक अशी सात मजली इमारत उभी राहणार आहे.या नियोजित इमारतीचा कोनशीला समारंभ २४ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता पार पडणार आहे. यावेळी वरील मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

**असा आहे सोहळा-** बुलढाणा वकील संघाचे अध्यक्ष ॲडव्होकेट विजय सावळे यांनी गुरुवारी ही माहिती दिली. स्थानिय पत्रकार भवन येथे आज गुरुवारी, २२ ऑगस्ट रोजी त्यांनी प्रसिद्धी माध्यम प्रतिनिधी समवेत संवाद साधताना कार्यक्रमाची रूपरेषा विशद केली. ॲड सावळे म्हणाले की, जिल्हा न्यायालयाच्या ११५ वर्ष जुन्या इमारतीचे पुनर्निर्माण होणार असून, वकील संघाच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाले आहे. बुलढाणा जिल्हा न्यायालयाची मुख्य इमारत सात मजली होणार आहे. अत्याधुनिक सोयी सुविधायुक्त अशी ही इमारत पुढील दोन वर्षाच्या कालावधीत पूर्णत्वास जाणार आहे. जिल्हा न्यायालयाच्या नूतन इमारतीचा कोनशिला समारंभ शनिवारी, २४ ऑगस्टला सकाळी ११ वाजता होणार आहे.सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या शुभहस्ते कोनशिला समारंभ होणार आहे.या सोहळ्याला सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रसन्न वराळे, उच्च न्यायालय मुंबई चे मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती तथा बुलडाणा जिल्ह्याचे पालक न्यायाधीश नितीन सांबरे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम होणार असून प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश स्वप्निल चंद्रकांत खटी यांची प्रमुख उपस्थिती या कार्यक्रमाला लाभणार आहे. कोनशिला समारंभनंतर सहकार विद्या मंदिराच्या सांस्कृतिक सभागृहात स्वागत समारोह व विधी साक्षरता जनजागृतीचा कार्यक्रम होईल, अशी माहिती ड. विजय सावळे यांनी दिली.यावेळी ॲड आरिफ सैय्यद, धीरज मुंदे, अमोल बल्लाळ, सुभाष वाघ हजर होते.

### चोख सुरक्षा व्यवस्था

सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींना झेड. दर्जाची सुरक्षा प्रदान करण्यात आली आहे. यामुळे पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्ताचे नियोजन केले आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक सुनील कडासने यांच्या नेतृत्वाखाली बंदोबस्ताचे नियोजन करण्यात आले आहे.

# नितीन भट यांना राज्यस्तरीय 'आनंदी साहित्य पुरस्कार

**'विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अमरावती :**अकोला येथील आनंदी गुरुकुल ॲक्टिंग अ‍ॅकॅडमीच्या वतीने दिल्या जाणारा यंदाचा राज्यस्तरीय आनंदी साहित्य पुरस्कार अमरावती येथील सिनेगीतकार आणि गज़लकार नितीन भट यांच्या 'उन्हात घर माझे' या गज़लसंग्रहाला जाहीर झाला आहे. अशी माहिती अ‍ॅकॅडमीच्या संस्थापक अध्यक्ष गुरुवर्या प्रा. दीपाली आतिश सोसे यांनी कळविली आहे. नितीन भट यांच्या गज़लसंग्रहाला प्राप्त झालेला हा सतरावा पुरस्कार आहे, हे विशेष.रविवार दि. १ सप्टेंबर रोजी आनंदी गुरुकुल एक्टिंग अ‍ॅकॅडमी, अकोला येथे अमरावतीचे खासदार बळवंत वानखडे यांच्या हस्ते अकोला येथे त्यांना हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.नितीन भट यांच्या 'उन्हात घर माझे' या काव्यसंग्रहाची दुसरी आवृत्ती नुकतीच प्रकाशित झाली असून तिला प्रख्यात संगीतकार अशोक पत्की यांचे शब्दाशीर्वाद लाभलेले आहेत. यापूर्वी नितीन भट यांना विदर्भ साहित्य संघ, साहित्य विहार, सदानंद साहित्य मंडळाचा सुरेश कुलकर्णी स्मृती पुरस्कार, नाशिकच्या साहित्यकणा फाउंडेशनचा सुमनताई पंचभाई स्मृती पुरस्कार, ठाणे येथील मराठी साहित्य मंडळाचा राज्यस्तरीय सावित्रीबाई फुले साहित्यभूषण पुरस्कार, अकोल्याच्या शब्दसृष्टी युवा संस्थेचा साहित्यरत्न पुरस्कार, अक्षरोदय काव्यगौरव तसेच नागपूरच्या मातोश्री संताजी संस्थेचा मातोश्री काव्यपुरस्कार, पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या शाखा दामाजीनगरचा साहित्य पुरस्कार, मुंबईच्या दत्तात्रेय कृष्ण सांडू प्रतिष्ठानचा साहित्य पुरस्कार असे एकूण सोळा पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

# महाज्योती'च्या योजनांचा क्यूआर कोड स्कॅनरने गाठला १६ लाखांचा टप्पा

## ३० दिवसांत लाखो विद्यार्थ्यांनी दिली संकेतस्थळावर भेट, विविध योजना उपलब्ध करून देण्याचा महाज्योतीचा माणस

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३ अमरावती**

राज्य शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाची स्वायत्त असलेली महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) ही मूल्याधिष्ठ शिक्षणाचा प्रसार ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी काम करीत आहे. महाज्योती द्वारे एमएचटी-सीईटी, जेईई, नीट, संघ लोकसेवा आयोग (युपीएससी), महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी), पायलट ट्रेनिंग, पीएचडी स्कील डेवलपमेंट आदिंचे विद्यार्थ्यांना मोफत प्रशिक्षण देण्यात येत आहे. गुणवंत आणि गरजू विद्यार्थ्यांना महाज्योतीतर्फे दर्जेदार प्रशिक्षण मिळावे तसेच विद्यावेतनातून त्यांना अर्थसहाय्याचे पाठबळ देण्याचे मोलाचे कार्य संस्था करीत असल्यानेच आज राज्यातील हजारो विद्यार्थ्यांनी उतुंग यश प्राप्त केले आहे.

राज्यातील ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी प्रवर्गातील प्रत्येक विद्यार्थ्यांना महाज्योतीच्या विविध योजनांची माहिती पोहचण्याकरिता .mahajyoti.org.in हे संकेतस्थळ तयार केले आहे. महाज्योतीच्या वेबसाईट वर विद्यार्थ्यांना जलद आणि सोप्या पद्धतीने पोहचण्याच्या उद्देशाने संस्थेने २४ जुलै रोजी मोबाईलचे क्यूआर कोड स्कॅनर तयार केले. अत्याधुनिक असलेले यास्कॅनर कोडवर असलेल्या या https://mahajyoti.org.in/schemes/ संकेतस्थळावर १६ लाखांच्यावर विद्यार्थ्यांनी भेट घेत विविध योजनांची माहिती जाणून घेतली.

महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक श्री. राजेश खवले यांनी सांगितले की, राज्यातील ओबीसी, व्हिजेएनटी व एसबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना गेल्या चार वर्षांपासून दर्जेदार प्रशिक्षण तसेच विद्यावेतनातून त्यांना अर्थसहाय्याचे पाठबळ देण्याचे मोलाचे कार्य संस्था करीत आहे. महाज्योतीद्वारे प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रमाच्या जोरावर घवघवीत यश प्राप्त केले आहे. त्यामुळे महाज्योतीबाबत विद्यार्थ्यांना माहिती ही एक क्लिक




वर प्राप्त व्हावी याकरिता स्कॅनर कोड तयार करण्यात आले असून ३० दिवसांत १६ लाख १ हजार ६१ च्यावर टप्पा संकेतस्थळावर विद्यार्थ्यांनी गाठला आहे. यामुळे महाज्योती मार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती जाणून घेण्यासाठी प्रत्येक विद्यार्थी आज उत्सूकतेने संस्थेच्या संकेतस्थळाला भेट देत असून ही अभिमानास्पद बाब आहे, असल्याचा विश्वास श्री. राजेश खवले यांनी व्यक्त केले. महाज्योतीचे अध्यक्ष तथा इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे मंत्री मा. श्री. अतुल सावे यांनी महाज्योतीमार्फत तयार केलेल्या स्कॅनर कोड द्वारे संकेतस्थळाला भेट देणाऱ्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले असून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. २३ ऑगस्ट २०२४ — शहर/ग्रामिण

# अजित पवार गट राष्ट्रवादी काँग्रेस ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी संतोष महात्मे

## जिल्ह्यात आनंदाचे वातावरण



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३ अमरावती**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट अमरावती (ग्रामीण) जिल्हाध्यक्षपदी संतोष महात्मे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. गुरुवारी मुंबई येथील प्रदेश कार्यालयामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे साहेब यांनी नियुक्तीचे पत्र दिले.

यावेळी प्रदेश सरचिटणीस आ. गर्जे साहेब, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या महिला आघाडीच्या माजी प्रदेशाध्यक्ष सुरेखाताई ठाकरे, नागपूर ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष शिवराज बाबा गुजर, नागपूर शहर जिल्हाध्यक्ष प्रशांतजी पवार यावेळी उपस्थित होते.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार, राष्ट्रीय नेते प्रफुल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, माजी मंत्री राजेंद्र शिंगणे, पक्षाचे जेष्ठ नेते संजय खोडके, महिला आघाडीचे अध्यक्ष रूपालीताई चाकणकर, अमरावती जिल्ह्याचे निरीक्षक वसंतरावजी घुईखेडकर यांचे सूचनेवरून त्यांची जिल्हाध्यक्ष (ग्रामीण) पदावर नियुक्ती करण्यात आली. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील पक्ष संघटन बळकट करण्याकरिता जबाबदारी देण्यात आलेली आहे.

या आधी संतोष महात्मे यांनी जिल्हा परिषद उपाध्यक्ष म्हणून प्रशासकीय पदावर कार्य केलेले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अमरावती ग्रामीणचे युवक अध्यक्ष म्हणून जबाबदारी यशस्वीपणे सांभाळलेली आहे. त्यांचे जिल्ह्यातील सहकार, सांस्कृतिक व सामाजिक चळवळीमध्ये मोठे कार्य आहे. ते संस्थापक अध्यक्ष असलेल्या राजमाता अहिल्यादेवी फाउंडेशनचे वतीने दरवर्षी समाजातील यशस्वी स्त्री शक्तीचा पुरस्कार देऊन गौरव केला जातो. अमरावती जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात नेत्र तपासणी व नेत्र शस्त्रक्रिया केल्या जाते. त्याचप्रमाणे सतत भटकंती करणाऱ्या मेंढपाळ धनगरांच्या राज्यस्तरीय संघटनांचे ते संस्थापक अध्यक्ष आहेत.

विविध सामाजिक उपक्रमामध्ये त्यांचा नेहमी सहभाग असतो. त्यांच्या नियुक्तीमुळे जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी संघटने मध्ये उत्साह निर्माण झालेला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या जिल्ह्यातील सर्व कार्यकर्त्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# आ. राणा चा घरपोच नि:शुल्क किराणा वाटप अभियानाचा प्रारंभ

## रक्षाबंधन निम्मित लाडक्या बहिणींना एक साडी व प्लेट मोफत घरपोच नि:शुल्क

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती** जनतेचे कैवारी आमदार रवी राणा,१लाख घरी वाटणार उच्चप्रतीचा किराणा, सर्वसामान्यांच्या जीवनात गोडवा निर्माण करण्यासाठी ,गोरगरीबांना राखी, गणपती, नवरात्री व दिवाळी आनंदात साजरी करता यावी यासाठी आमदार रवी राणा यांच्या वतीने संपूर्ण बडनेरा मतदर संघांतील शहरी व ग्रामीण भागात १लाख कुटुंबियांना उच्च प्रतीचा किराणा व रक्षाबंधन निम्मित लाडक्या बहिणींना एक साडी व प्लेट मोफत घरपोच नि:शुल्क मिळणार,किराणा वाटप अभियानाचा प्रारंभ करण्यात आला आहे.

गेल्या १५ वर्षापासून सुरू असलेला हा जिव्हाळ्याचा उपक्रम याही वर्षी सुरू झालेला आहे प्रत्येक कुटुंबाला पुरेल असे उच्च प्रतीचे किराणा साहित्य या किराणा बॅग मध्ये असेल ज्यात साखर, तेल, चणाडाळ, पोहे, सोयाबीन वडी, शेंगदाणे, मुरमुरे, मसाला पाकीट, मिठपुडा आदी साहित्य आहे.



एक हमालाचा मुलगा म्हणून बालपणी आपण गरिबीचे चटके भोगले असल्याने व गरिबी आली तर लाजू नये आणि श्रीमंती आली तर माजू नये या तत्त्वाने जगणारे आपण असल्याने आपले सामाजिक दायित्व जोपासण्यासाठी आणि प्रत्येक कुटुंबियांसोबत असलेले आपुलकीचे नाते कायमस्वरूपी जोपासण्यासाठी हा उपक्रम गेल्या १५ वर्षापासून आपण राबवित असून भविष्यातही हा उपक्रम असाच सुरू ठेवण्याचा आपला संकल्प असल्याचे आमदार रवी राणा यांनी यावेळी सांगितले

पार्वती नगर पासून या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली,सर्व स्वाभिमानी शिलेदार अत्यंत नम्रपणे कुणाचाही आत्मसन्मान न दुखावता घरपोच किराणा वाटप करीत आहेत, जवळपास १ हजार स्वाभिमानी शिलेदार सेवाभावी वृत्तीने ४ गोडावून मध्ये शेकडो टण किराणा साहित्याचे पॅकिंग अहोरात्र करीत असून ५०० स्वाभिमानी पदाधिकारी व कार्यकर्ते कुठलाही भेदभाव न करता प्रत्येक लाभार्थी कुटुंबियांना घरपोच किराणा किट देण्याचे कार्य करीत आहेत

आमदार रवी राणा हे खऱ्या अर्थाने गोरगरिबांचे कैवारी असून ते आमच्या सुखदु:खात सहभागी होत असतात व ऐन सणासुदीच्या तोंडावर ते घरपोच किराणा देवून आमच्या जीवनात गोडवा निर्माण करत असल्याच्या प्रतिक्रिया परिसरातील महिला पुरुष,युवक युवती व ज्येष्ठ नागरिक व्यक्त करत आहे.

# बदलापूर इम्पॅक्ट; नांदगाव पेठच्या लेडी सिंघम ॲक्शन मोडवर

## शाळांना भेटी, विद्यार्थिनींना गुड-बॅड टच बाबत मार्गदर्शन, प्राध्यापक , शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची घेतली माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३ नांदगाव पेठ**

महाराष्ट्रच नव्हे तर देशाला काळिमा फासणाऱ्या बदलापूर येथील घटनेने समाजमनात असंतोष खदखदत असतांना पालकांमध्ये सुद्धा आपल्या पाल्यांच्या सुरक्षिततेच्या बाबतीत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.बदलापूर घटनेची गंभीर दखल नांदगाव पेठ पोलीस स्टेशनने घेतली असून लेडी सिंघम पोलीस निरीक्षक रेखा लोंढे यांनी बुधवारी सकाळपासून नांदगाव पेठमधील शाळांना भेटी दिल्या.विद्यार्थिनींसह, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची भेट घेऊन त्यांचे समुपदेशन करण्यात आले. नांदगाव पेठ पो.स्टे. हद्दीतील माध्यमिक कन्या विद्यालय नांदगाव पेठ, जिल्हा परिषद उर्दु स्कुल नांदगाव पेठ, अंजुमन उर्दु हायस्कूल नांदगाव पेठ या शाळांना पोलीस निरीक्षक रेखा लोंढे यांनी भेटी देऊन विद्यार्थिनींशी प्रत्यक्ष संवाद साधला.त्यांच्या अडचणी समजून घेवुन त्यांना सेल्फ डिफेन्स ,गुड टच बॅड टच बाबत मार्गदर्शन करण्यात आले.शाळेत किंवा अन्य कोणत्याही ठिकाणी असुरक्षिततेची भावना निर्माण झाल्यास घाबरून जाऊ नका,पोलीस किंवा कुटुंबांना याबाबत तातडीने माहिती द्या, आपल्याला नक्कीच योग्य ती मदत मिळेल असे आश्वासन सुद्धा पो.नि.रेखा लोंढे यांनी विद्यार्थिनींना दिले. शाळेमधील सर्व प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची भेट घेऊन त्यांनाही शाळेत



कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही याबाबत दक्षता घेण्यासंदर्भात सूचना दिल्या.नांदगाव पेठ पोलीस स्टेशन हद्दीतील सर्वच शाळांमध्ये जाऊन पोलीस प्रशासन विद्यार्थ्यांशी तसेच शिक्षकांशी संवाद साधणार असून भविष्यात कोणताही अनुचित प्रकार आपल्या परिसरात घडणार नाही यासाठी सामुहिक प्रयत्न करणार असल्याचे यावेळी पो.नि. रेखा लोंढे यांनी म्हटले आहे.

### पालकांनी पाल्यांशी सुसंवाद आवश्यक

पालकांचा आपल्या पाल्यांशी सुसंवाद असणे अत्यंत आवश्यक आहे.पाल्यांशी मैत्रीपूर्ण संवाद असेल तरच पाल्य निसंकोचपणे पालकांकडे व्यक्त होईल.घरी सुद्धा आई वडिलांनी मुलींना गुड टच बॅड टच शिकविणे गरजेचे आहे.आपल्या पाल्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी आपली आहे त्यामुळे पालकांनी सुद्धा पाल्यांच्या बाबतीत सतर्क राहणे महत्वाचे आहे.

**रेखा लोंढे,** पोलीस निरीक्षक, पो.स्टे. नांदगाव पेठ

# २६ ला नांदगाव पेठ येथे भोलेनाथ कावड यात्रा

## संगमेश्वर मंदिर ते भोलेनाथ चौक असेल कावड यात्रेचा मार्ग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३नांदगाव पेठ**

श्रावण मासाचे औचित्य साधून भोलेनाथ क्रीडा व शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने २६ ऑगस्ट रोजी कावड यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.सायंकाळी ५ वाजता संगमेश्वर मंदिर येथून जल घेऊन या कावड यात्रेला प्रारंभ होईल आणि भोलेनाथ चौक येथील मंदिरात जलार्पण करून कावड यात्रेचा समारोप होईल. श्रावणमासात भोलेनाथाची आराधना करण्यात येते.या पवित्र महिन्यात सोमवारी शिवलिंगावर जलाभिषेक करण्यात येतो. नांदगाव पेठ येथे पुरातन असलेले संगमेश्वर देवस्थान याठिकाणी शिवलिंग असून विदर्भातून भाविक त्याठिकाणी दर्शनाला येतात तर शासकीय वसाहत स्थित भोलेनाथ मंदिरातील शिवलिंगाला ऐतिहासिक महात्म्य आहे त्यामुळे भोलेनाथ क्रीडा व शिक्षण मंडळाच्या वतीने पहिल्यांदाच कावड यात्रेचे आयोजन करण्यात येत आहे. २६ ऑगस्ट रोजी सायंकाळी पाच वाजता ही कावड यात्रा संगमेश्वर येथून जल घेऊन यावलपुरा,बारीपुरा,छत्रपती शिवाजी महाराज चौक, बस स्टॅण्ड, शासकीय वसाहतस्थित भोलेनाथ चौक अशी मार्गक्रमण करणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे खा. बळवंत वानखडे व आ. यशोमती ठाकूर यांच्या हस्ते महाआरती होणार असून भोलेनाथ चौक येथे शिवलिंगावर जलार्पण करून कावड यात्रेचा समारोप होणार आहे.२७ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ ते १० या वेळेत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असुम सर्व शिवभक्तांनी या कावडयात्रेत मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन मंडळाचे अध्यक्ष पंकज शेंडे व उपाध्यक्ष अमित यादव यांनी केले आहे.

# उद्याला भाजपा प्रदेशाध्यक्ष आ.चंद्रशेखर बावनकुळे चिखलदरा येथे मेळघाट विधानसभा क्षेत्राचा घेणार आढावा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३ चिखलदरा** – भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष आमदार श्री चंद्रशेखर बावनकुळे शुक्रवार व शनिवार दि. २३ व २४ ऑगस्ट २०२४ रोजी दोन दिवस अमरावती जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यात ते जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघाचा दौरा करणार असून कार्यकर्त्यांशी संवाद साधतील. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांचा हा दौरा महत्वाचा मानला जात आहे. जिल्ह्यातील सर्व प्रमुख नेते व भाजपा पदाधिकारी त्यांच्या या दौऱ्यात उपस्थित राहतील.



शुक्रवारचा अमरावती जिल्हा झाल्यानंतर शनिवार दि. २४ रोजी सकाळी १० वा. चिखलदरा येथे मेळघाट विधानसभा क्षेत्रातील पदाधिकाऱ्यांशी संवाद साधतील. दुपारी २ वा. अचलपूर येथील अंबिका लॉन, परतवाडा येथे अचलपूर-चांदूरबाजार विधानसभा क्षेत्रातील पदाधिकाऱ्यांशी संवाद साधतील.

सायं. ६ वा. दर्यापूर येथील विहान रिसॉर्ट (मंगल कार्यालय), हिंगणी रोड येथे दर्यापूर विधानसभा क्षेत्रातील पदाधिकाऱ्यांशी संवाद साधतील.

त्यांच्या या प्रवासात जिल्हाध्यक्ष खा. अनिल बोंडे, अमरावती शहराध्यक्ष आ. प्रवीण पोटे, आ. प्रताप अडसड, दत्ताजी गेडाम, डॉ. मनोहर हाडे, राजेश वानखेडे, किरण पातुरकर, निवेदिता चौधरी, प्रवीण तायडे, गोपाल चंदन यांच्यासह सर्व प्रमुख पदाधिकारी उपस्थित राहतील.

# अटल भुजल योजनेतंर्गत तालुकास्तरीय प्रशिक्षण संपन्न; तज्ज्ञांनी केले विविध विषयावर मार्गदर्शन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३ अमरावती,** भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा अमरावतीमार्फत अटल भूजल योजनेतंर्गत तालुकास्तरावर सलंग्न विभागासाठी एक दिवशीय प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. सदर प्रशिक्षण शेतकरी उत्पादन कंपनी व्यवस्थापन आणि उद्योग संधी या विषयावर चांदुर बाजार, मोर्शी व वरुड तालुक्यात अनुक्रमे दि. ८, ९ व १२ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणामध्ये विषय तज्ज्ञांनी विविध विषयावर मार्गदर्शन केले. चांदुर बाजार येथील तालुकास्तरीय प्रशिक्षणामध्ये भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणाचे कनिष्ठ भूवैज्ञानिक हरीश कठारे यांनी अटल भूजल योजनेतंतर्गत डीएलआय १ ते ५ अंतर्गत केले जात असलेल्या कामाची माहिती दिली. एफपीओची संकल्पणेविषयी कृषी तज्ञ दिनेश खडसे यांनी सादर केली. तसेच एफपीओची नोंदणीचे टप्पे, आवश्यक कागदपत्रे, व्यवसायाची संधी, उत्पादन, सेवा, व्यापार, संकरीत, गट चर्चा याविषयावर तालुका कृषी अधिकारी चांदूर बाजारचे फाल्गुनी ननीर यांनी सादरीकरण केले. नैसर्गिक शेतीची गरज व भूजल समृद्ध ग्राम स्पर्धेत तालुक्यातील ग्रामपंचायतचा सहभाग तसेच ग्रामपंचायत स्तरावर सुरु



असलेल्या क्षमता बांधणी प्रशिक्षणाबाबत माहिती शिक्षण व संवाद तज्ञ प्रमोद झगेकर यांनी दिली. जलसंधारण तज्ञ सचिन चव्हाण यांनी खुल्याचर्चेच्या माध्यमातून उपस्थितासोबत संवाद साधला. प्रशिक्षणमध्ये तहसिलदार प्रथमेश मोहोड यांनी तालुका स्तरावर सुरु असलेल्या विविध उपक्रमाचा आढावा घेऊन मार्गदर्शन केले. प्रशिक्षणाचे सूत्र संचालन प्रमोद झगेकर यांनी तर आभार प्रदर्शन कृषी तज्ञ नारायण फटिंग यांनी केले. प्रशिक्षणाला मृदा व जलसंधारण विभाग, वनविभाग, कृषी विभाग, जलसंधारण, आत्मा तसेच संलग्न विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांचेसह भूजल मित्र, कृतिशील शेतकरी व डिपीएमयू तसेच जिल्हा भागीदार संस्था अश्वमेध ग्रामीण पाणलोट क्षेत्र विकास व शैक्षणिक संस्था मोर्शीचे समन्वयक, विषय तज्ञ व समूह संघटक उपस्थित होते. प्रशिक्षणाला मृदा व जलसंधारण विभाग, वनविभाग, कृषी विभाग, जलसंधारण, आत्मा तसेच संलग्न विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांचेसह भूजल मित्र, कृतिशील शेतकरी व डिपीएमयू तसेच जिल्हा भागीदार संस्था अश्वमेध ग्रामीण पाणलोट क्षेत्र विकास व शैक्षणिक संस्था मोर्शीचे समन्वयक, विषय तज्ञ व समूह संघटक उपस्थित होते.

# गेल्या वर्षीचाच पीक विमा रखडला, राज्य सरकारकडून १,८७७ कोटींचे देणे, हजारो शेतकरी वंचित

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३पुणे :** आर्थिक अडचणीत सापडलेल्या राज्य सरकारने पंतप्रधान खरीप विमा योजनेतील ओरिएंटल इन्शुरन्स या कंपनीचे अद्याप १,८७७ कोटी रुपये न दिल्याने सहा जिल्ह्यांमधील अनेक शेतकऱ्यांना पीक विम्याच्या लाभांपासून वंचित राहावे लागले आहे. त्यासोबतच युनायटेड इंडिया कंपनीला ३२ कोटी, तर भारतीय कृषी विमा कंपनीला २०० कोटी रुपयांचे देणे आहे. दरम्यान, विम्याच्या हप्त्यापेक्षा भरपाईचे दावे कमी आल्यामुळे सात विमा कंपन्यांकडून राज्य सरकारला १,३७२ कोटी रुपये परत मिळणार आहेत.

गेल्या वर्षीच्या पंतप्रधान खरीप पीक विमा योजनेत नाशिक, जळगाव, नगर, सोलापूर, सातारा व चंद्रपूर या सहा जिल्ह्यांसाठी ओरिएंटल इन्शुरन्स विमा कंपनीला कंत्राट देण्यात आले होते.

या सहाही जिल्ह्यांमध्ये नुकसान भरपाईचे दावे ११० टक्क्यांपेक्षा जास्त असल्याने नियमानुसार अतिरिक्त रक्कम राज्य सरकारने देणे गरजेचे



आहे. त्यानुसार ओरिएंटल इन्शुरन्स विमा कंपनीला राज्य सरकारकडून १ हजार ८७७ कोटी रुपयांचा हप्ता अद्याप मिळालेला नाही. त्यामुळे या सहा जिल्ह्यांमधील हजारो शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळालेली नाही.

### कंपन्यांकडून मिळणार फरक

खरीप पीक विमा योजनेतील बीड पॅटर्ननुसार १०० टक्क्यांपेक्षा कमी नुकसान भरपाई असल्यास ८०-११० या सुत्रानुसार विमा कंपनीला देण्यात आलेला हप्ता नुकसान भरपाईच्या दाव्यापेक्षा जास्त असल्यास विमा कंपनीचा २० टक्के नफा वगळून उर्वरित रक्कम राज्य सरकारला देणे बंधनकारक आहे.त्यानुसार आयसीआयसीआय, युनिव्हर्सल सोम्पो, युनायटेड इंडिया, चोलामंडलम, भारतीय कृषी विमा कंपनी, एचडीएफसी आणि रिलायन्स या सात कंपन्यांकडून सरकारला १,३७२ कोटी रुपये परत मिळणार आहेत.

मात्र, ही नुकसानभरपाई लवकरच मिळेल, त्यासंदर्भात कृषी सचिवांनी राज्य सरकारच्या वित्त विभागाकडे प्रस्ताव सादर केला आहे, असे कृषी विभागाकडून स्पष्ट करण्यात आले. तर ३१ ऑगस्टपूर्वी या सर्व

### राज्य सरकारला परत मिळणारी रक्कम

| | |
|---|---|
| आयसीआयसीआय | २०३ |
| युनिव्हर्सल सोम्पो | १३५ |
| युनायटेड इंडिया | ९३ |
| चोलामंडलम | २१ |
| भारतीय कृषी विमा | १५४ |
| एचडीएफसी | ३८५ |
| रिलायन्स | ३८१ |
| एकूण | १,३७२ |

जिल्ह्यांमधील शेतकऱ्यांना नुकसानभरपाई दिली जाईल, असे विमा कंपनीकडून स्पष्ट करण्यात आले आहे. याव्यतिरिक्त राज्य सरकारकडून युनायटेड इंडिया विमा कंपनीला ३२ कोटी, तर भारतीय कृषी विमा कंपनीला २०० कोटी रुपयांचे देणे आहे. याबाबत लवकरच निर्णय होणार आहे.

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतंर्गत लाभार्थ्यांना नियुक्ती आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

मनपा आयुक्त सचिन कलंत्रे यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण महानगरपालिका कॉन्फरन्स हॉल येथे आयोजित करण्यात आला होता, या प्रशिक्षणाला अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, उपायुक्त नरेंद्र वानखडे, उपायुक्त योगेश पिठे, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, धनंजय शिंदे, शिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम, कार्यालय अधिक्षक नंदकिशोर पवार, मनपा कर्मचारी उपस्थित होते. या प्रशिक्षणात मा.आयुक्त सचिन कलंत्रे यांच्या उपस्थितीत सदर प्रशिक्षणाला सुरुवात करण्यात आली. त्यापूर्वी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत लाभार्थ्यांना कागदपत्र व पडताळणी करिता बोलवण्यात आले होते. त्यापैकी संमती दर्शविणारे २० लाभार्थी युवक / युवती यांना आयुक्त सचिन कलंत्रे यांनी त्यांचे शुभहस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले व आजपासून सदर युवक / युवती यांना रुजू करुन घेण्यात आले. महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांनी योजनेची संपूर्ण माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली व त्यांच्या सेवेची संधी समजावून दिली. सदर उमेदवाराचे मुलाखती घेवून कागदपत्राची तपासणी करण्यात आली व त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार त्यांना सहा महिन्यासाठी ६०००/-, ८०००/- व १०,०००/- रुपये विद्यावेतन अदा करण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण कार्य निवड झालेले उमेदवार महानगरपालिकेत रुजू झालेले आहेत.

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने अंतर्गत अधिकाधिक शासकीय व खाजगी आस्थापना / महामंडळे / उद्योजक आणि जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अमरावती या कार्यालयाशी समन्वय साधून मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवावा व योजना यशस्वी करावी, असे आवाहन



मा. आयुक्त सचिन कलंत्रे यांनी यावेळी केले.

या प्रशिक्षणात सोपान ढोले, गैरव राऊत, पुजा सोळंके, सुनित निरगुळे, कशीश गोया, राज ढोके, विजय आवारे, दर्शन ठाकरे, नैशाद अली, अनुश्री कडु, रुपेश परिमल, अनिकेत मामुरकर, प्रज्वल भालेराव, शिल्पा परिमल, निरज तायवाडे, प्रणय इंगोले, प्रशांत आठवले, स्वाती नंदेश्वर, प्रज्वल शेंडे, काजल भदवरीया असे एकुण २० प्रशिक्षणार्थींना रुजु आदेश देण्यात आले.

सदर प्रशिक्षणाचे संपूर्ण काम उपायुक्त नरेंद्र वानखडे यांच्या अधिपत्याखाली चालू आहे.

सदर प्रशिक्षण यशस्वी करण्याकरीता कार्यालय अधिक्षक नंदकिशोर पवार, लिपिक शेखर ताकपीठे, कनिष्ठ लिपिक अमोल साकुरे, शुभम वानखडे यांनी परिश्रम घेतले.

# बलात्काऱ्यांचे संरक्षण करणारे सरकार - काँग्रेसच्या प्रवक्त्या अनुमा आचार्य यांचा घणाघात

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२३ अमरावती –** केंद्रातील असो वा महाराष्ट्रातील सरकार असो हे अत्याचार करणाऱ्यांना बलात्कार करणाऱ्यांना संरक्षण देणारे सरकार आहे. जोपर्यंत अशा सरकारांच्या विरोधात आपण ठामपणे उभे राहत नाही आणि त्यांना जाब विचारत नाही तोपर्यंत परिस्थिती बदलणार नाही त्यामुळे अशा लोकांच्या विरोधात आपण ठामपणे एकत्र येऊन उभे राहिले पाहिजे असे आवाहन काँग्रेसच्या राष्ट्रीय प्रवक्त्या निवृत्त विंग कमांडर अनुमा आचार्य यांनी आज केले. अमरावती येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या.

महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून लहान मुलींवर अत्याचाराच्या घटना वाढल्या आहेत. बदलापूर येथील घटना ही अत्यंत भीषण आणि हृदय द्रावक आहे. या घटनेमध्ये सरकारने आणि प्रशासनाने हलगर्जीपणा करून आरोपींना मदत होईल अशा प्रकारची वागणूक दिली असा आरोप आचार्य यांनी यावेळी केला.

बदलापूरच्या घटनेत असलेली आदर्श शाळा ही भाजपच्या दोन पदाधिकाऱ्यांची शाळा आहे. आपटे आणि काटकर हे दोन पदाधिकारी या शाळेच्या संचालक मंडळावर आहेत त्यामुळेच या शाळेवर कारवाई करण्यासाठी सरकारला आणि प्रशासनाला वेळ लागला. जनतेने जेव्हा हा प्रश्न हातात घेतला तेव्हा यांना जाग आली आणि नाईलाजाने कारवाई करावी लागली. हाच



जनतेचा रेटा आणि जनतेची ताकद अशा दोन्ही सरकार विरोधात आपल्याला वापरावी लागेल असेही आचार्य यावेळी म्हणाल्या. गेल्या काही काळामध्ये मणिपूर मधल्या हिंसाचारापासून ते दिल्लीत कुस्तीपटू महिलांवर झालेले अत्याचार असतील, विविध राज्यांमध्ये महिलांवर होणारे अत्याचार असतील किंवा महाराष्ट्रात लहान मुलींवर होणाऱ्या अत्याचारांचे प्रमाण असेल हे अत्यंत भीषण आहे. मात्र हे सरकार अशा बलात्कारांना आणि अत्याचार करणाऱ्यांना नेहमी संरक्षण देताना दिसते आहे यांच्या विरोधात सर्व विरोधकांनी एकत्र येऊन लढायला पाहिजे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. तर राज्यात महाविकास आघाडीचे सरकार असताना राज्य सरकारने अशा गुन्हेगारांना कडक शिक्षा देण्यासाठी शक्ती कायदा केला होता. मात्र हा कायदा सुद्धा आता राष्ट्रपतींकडे प्रलंबित असून राज्य सरकार आणि केंद्र सरकारने या मध्ये तातडीने पाठपुरावा करून त्याची पूर्तता करणे आवश्यक आहे मात्र यांनी त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा आरोप माझी महिला आणि बालविकास मंत्री तथा राज्याच्या काँग्रेसच्या नेत्या आमदार ड.यशोमती ठाकूर यांनी यावेळी केला.या पत्रकार परिषदेला काँग्रेसचे खासदार बळवंतराव वानखडे, आमदार ड. यशोमती ठाकूर, जिल्हाध्यक्ष बबलु देशमुख, बबलु शेखावत अध्यक्ष अमरावती शहर काँग्रेस, विरेंद्र जगताप, विलास इंगोले (माजी महापौर) जयश्री वानखडे अध्यक्षा महिला काँग्रेस, मिलींद चिमोटे, आसिफ तव्वकल, निलेश गुहे तसेच अन्य कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

### अमरावतीकर जनतेने उद्याच्या बंद मध्ये स्वयंस्फूर्तीने सहभाग घेण्याचे आवाहन

ठाणे जिल्ह्यातील चार वर्षाच्या दोन मुलींवर शाळेतील नराधम कर्मचाऱ्याने लैंगिक अत्याचार केल्या प्रकरणा विरोधात राज्यातील कायदा व सुव्यवस्था च्या प्रश्नकी महाविकास आघाडीतील मित्रपक्ष काँग्रेस , शिवसेना (उबाठा ) ,राष्ट्रवादी (शरद पवार)भारतीय कम्युनिस्ट पार्टी,आम आदमी पार्टी यांचे वतीने दिनाक २४ ऑगस्ट रोजी महाराष्ट्रव्यापी बंदचे आवाहन करण्यात आलेले आहे.त्याच प्रमाणे अमरावती शहरामध्ये महानगरपालिका प्रशासनाने पर्यायाने महारष्ट्र शासनाने लादलेला अवाढव्य प्रॉपर्टी टॅक्स च्या विरोधात अमरावती येथील राजकमल चौक येथे सकाळी ९ वाजता करण्यात येणार आहे अमरावती शहरातील सर्व संवेदनशील नागरिकांनी या अत्याचाराच्या विरोधात वज्रमूठ करून अमरावती बंद यशस्वी करावा असे आवाहन करण्यात येत आहे.

# शिक्षकी पेशाला काळीमा, अमरावतीत शिक्षकाकडून विद्यार्थिनीचा विनयभंग

**विदर्भ प्रजासत्ताकक**
**दि.२३अमरावती :**

येथील चपराशीपुरा परिसरातील एका शाळेतील शिक्षकाने १४ वर्षीय विद्यार्थिनीच्या शरीराला आक्षेपार्ह स्पर्श करून (बॅड टच) विनयभंग केल्याचा प्रकार घडला आहे. या प्रकरणी पोलिसांनी शिक्षकाच्या विरोधात गुन्हा दाखल करून त्याला अटक केली. रियाजउद्दिन शेख शफिउद्दिन शेख (५०) असे आरोपी शिक्षकाचे नाव आहे. कोलकाता बलात्कार व हत्या प्रकरण आणि बदलापुरातील लैंगिक अत्याचार प्रकरणामुळे महिला सुरक्षेचा प्रश्न चर्चेत आलेला असताना अमरावतीतही धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

आरोपी शिक्षक हा शारीरिक शिक्षण हा विषय शिकवतो. १७ ऑगस्ट रोजी सकाळी शाळेच्या मधल्या सुटीदरम्यान एक विद्यार्थिनी भोवळ येऊन खाली पडली. या मुलीला वर्गात बसवण्यात



आले. सर्व मुले-मुली तिच्या भोवती गोळा झाले होते. पीडित विद्यार्थिनी सर्वात मागे होती. त्यावेळी आरोपी शिक्षकाने मुलांना बाजूला करण्याच्या प्रयत्नात पीडित विद्यार्थिनीच्या शरीराला आक्षेपार्ह पद्धतीने स्पर्श केला. त्यावेळी पीडित मुलीने शिक्षकाचा हात झटकला आणि ती तेथून बाजूला झाली. यापूर्वी सुद्धा आरोपी शिक्षकाने पीडित विद्यार्थिनीला आपण बाहेर फिरून येऊ, असे म्हटले होते. ही बाब पीडित मुलीने तिच्या आईला सांगितली. पीडित मुलीची आई लगेच शाळेत पोहचली आणि तिने हा प्रकार शाळेच्या मुख्याध्यापकाला सांगितला. त्यानंतर फ्रेझरपुरा पोलीस ठाण्यात पोहचून तक्रार दाखल केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी शिक्षकाच्या विरोधात गुन्हा दाखल करून त्याला तत्काळ अटक केली.मागील वर्षी सप्टेंबर महिन्यात येथील इर्विन चौक परिसरातील एका नामांकित शाळेतील शिक्षकाने इयत्ता पाचवीत शिकणाऱ्या मुलीच्या शरीराला आक्षेपार्ह स्पर्श करून विनयभंग केल्याचा प्रकार घडला होता. पीडित मुलीने सुरुवातीला तिच्या कुटुंबीयांना या प्रकाराची माहिती दिली. त्यानंतर ही घटना उघडकीस आली होती.

# २९ऑगस्ट पासुन प्राथमिक शिक्षक बेमुदत संपावर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अमरावती–** पेन्शनसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळा, विद्यार्थी आणि शिक्षकांच्या मागण्यांच्या सोडवणुकीसाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती २९ ऑगस्ट पासून च्या बेमुदत संपात सहभागी होत आहे असे राज्याध्यक्ष विजय कोंबे यांनी कळविले आहे. १९८२ ची मुळची पेन्शन योजना जशीच्या तशी लागू झाली पाहिजेच. ही मागणी राज्य सरकारी निमसरकारी शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी संघटना समन्वय समिती व महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती ने सोडून दिलेली नाही. परंतु १ मार्च २०२४ रोजी मुख्यमंत्र्यांनी विधीमंडळात पेन्शनबाबत केलेल्या घोषणेनुसार आवश्यक अधिसूचना काढली नाही. त्याचप्रमाणे केंद्रानुसार निवृत्ती उपदान देण्याबाबतही घुमजाव केले आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक




शाळांमध्ये भौतिक सुविधांची प्रचंड कमतरता आहे. विद्यार्थ्यांना बसण्यासाठी साधे डेक्स बेंच आणि आसन पट्ट्या सुद्धा उपलब्ध नाहीत. १५ मार्च २०२४ ला काढलेल्या संच मान्यतेच्या शासन निर्णयानुसार राज्यातील शिक्षकांची पदे कमी होणार असून त्याचा फटका विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर विपरीत परिणाम करणारा ठरणार आहे. सदर शासन निर्णय मागे घेण्याची महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने सतत मागणी केली आहे. मतदार नोंदणीचे सतत चालणारे काम, ऑनलाइन अशैक्षणिक कामाचा प्रचंड हव्यास, नवभारत साक्षरता कार्यक्रम व दैनंदिन वेगवेगळ्या उपक्रमांच्या संख्येने अध्यापन कार्य प्रभावित होत आहे. विद्यार्थी मोफत गणवेश योजनेत केलेल्या बदलामुळे शाळा सुरू होऊन दोन महिने झाले असताना सुद्धा विद्यार्थ्यांना गणवेश मिळालेली नाहीत. शाळा इमारती व स्वच्छतागृहांची दुरुस्तीसाठी दुर्लक्ष होत आहे. इतर कर्मचारी आणि केंद्र सरकार प्रमाणे राज्यात प्राथमिक शिक्षकांना सेवांतर्गत आश्वासित योजना किंवा केंद्राप्रमाणे सरसकट निवड श्रेणी मिळत नाही. पदवीधर शिक्षकांना वेतनश्रेणी देताना समान तत्व लागू न करता ३३% ची अट घालून भेदभाव केला आहे.या मागण्यांची शासनाने सोडवणूक करावी अशी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती ची मागणी आहे असे राज्याध्यक्ष विजय कोंबे यांनी कळविले आहे. कर्मचारी, शिक्षकांच्याच नव्हे तर विद्यार्थी आणि शाळांच्या दृष्टीने महत्त्वाचे प्रश्न घेऊन महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती २९ ऑगस्ट पासून च्या बेमुदत संपात सहभागी होत आहे. या बेंबसंपात सर्व कर्मचारी शिक्षकांनी सहभागी होण्याचे आवाहन महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने केले आहे.

## सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२४;
# जिल्ह्यातील मंडळांनी सहभागी होण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती,**

जिल्हा नियोजन विभागातर्फे, सन २०२४ च्या गणेशोत्सवात सहभागी होणाऱ्या राज्यातील उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना पुररस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. राज्यातील पहिल्या तीन विजेत्या क्रमांकांना अनुक्रमे पाच लाख, अडीच लाख आणि एक लाख रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व मंडळांनी सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी दि. ३१ ऑगस्टपर्यंत अर्ज सादर करावा, असे आवाहन जिल्हा नियोजन अधिकारी अभिजित मस्के यांनी केले आहे.



गणेशोत्सवास दिनांक ७ सप्टेंबर रोजी सुरुवात होत आहे. नोंदणीकृत अथवा परवानाधारक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे या स्पर्धेत सहभागी होऊ शकतात. या स्पर्धेची माहिती आणि अर्ज हींीः// श्रिवशीहरिपिवशज्ञरश्रररलरवशू.ीस या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. जिल्हा नियोजन विभागाच्या दि. ३१ जुलै २०२४ च्या शासन निर्णयामध्ये स्पर्धा निवडीचे निकष, अर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहे. या अर्जाच्या नमुन्यानुसार स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी सांस्कृतिक कार्य विभाग, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांच्या चरर्हीीरीं.श्रिवरसारळश्र.लो या ईमेलवर अर्ज सादर करावा.